■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३२६ ■ बुधवार दि.१३ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 326 ■ Wednesday Dt. 13 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह, वरिष्ठांचा छळ पुन्हा चर्चेत; कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची हमी कुठे?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक
महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# गेवराई एसटी आगारात छळाचा बळी! वरिष्ठांच्या जाचाला कंटाळून लिपिकाची आत्महत्या; रुग्णवाहिका मृतदेह घेऊन थेट आगारात!

## मृतदेहासह संतप्त नातेवाईकांचा आगारात ठिय्या; दोषींवर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी?

गेवराई । प्रतिनिधी

**सहा महिन्यांपूर्वी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळालेल्या प्रितेश जयराम मोहिते (३२) या तरुण कर्मचाऱ्याने मंगळवारी सकाळी गळफास घेऊन आत्महत्या केली. गेवराई आगारातील वरिष्ठांकडून होत असलेल्या सततच्या त्रासाला कंटाळून प्रितेशने हे टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा आहे. घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी प्रितेशचा मृतदेह थेट गेवराई आगारात आणून आगार प्रमुखाच्या कार्यालयासमोर ठिय्या मांडला. यावेळी दोषींवर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी करण्यात आली. पोलिस व प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणामुळे गेवराई शहरात मोठी खळबळ उडाली असून, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत आणि वरिष्ठांकडून होणाऱ्या छळाच्या घटना पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. पोलिसांकडून याप्रकरणी तपास सुरू आहे.**








मिळालेल्या माहितीनुसार, प्रितेश मोहिते हे गेल्या काही महिन्यांपासून वरिष्ठांकडून होणाऱ्या जाचाला त्रस्त होते. अखेर त्यांनी स्वतःच्या घरी गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. या घटनेची माहिती मिळताच गेवराई पोलीस स्टेशनचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनेनंतर प्रितेशचा मृतदेह नातेवाईकांनी थेट एसटी आगारात आणून आगार प्रमुखाच्या कार्यालयासमोर ठिय्या दिला. यावेळी दोषींवर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी करण्यात आली. या प्रकारामुळे संपूर्ण आगार परिसरात आणि गेवराई शहरात एकच खळबळ उडाली आहे. कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आणि वरिष्ठांकडून होणाऱ्या छळाच्या घटना पुन्हा एकदा चर्चेत आल्या असून, गेवराई पोलिसांकडून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. गेवराई बस आगारांमधील लिपिक पदावरील प्रितेश मोहिते या युवकाने गळफास लावून आत्महत्या केली.

सहा महिन्यापूर्वी अनुकंपा तत्वावर गेवराई आगारांमध्ये लिपिक पदावर कार्यरत असणारे प्रितेश जयराम मोहिते वय (३२) यांनी आज दिनांक १२ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी गळफास लावून आत्महत्या केली. यामुळे संतप्त नातेवाईकांनी मृतदेह घेऊन गेवराई आगार प्रमुखाच्या कार्यालयासमोर ठेवला. आत्महत्याच कारणीभूत असणाऱ्या अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करा अशी मागणी नातेवाईकांनी केली.

या घटनेमुळे गेवराई बस स्थानकात खळबळ उडाली. गेवराई तालुक्यातील मादळमोही येथील श्री प्रितेश जयराम मोहिते हे अनुकंपा तत्वावर मागील सहा महिन्यापासून एसटी महामंडळातील लिपिक या पदावर कार्यरत होते. ते नेहमीप्रमाणे कालही आपल्या कामावर हजर झाले परंतु ते अचानक घरी परत गेले व घरी जाऊन त्यांनी गळफास लावून आत्महत्या केली. यामुळे नातेवाईक क खूप संतप्त झाले. त्यांनी सदरील मृतदेह रुग्णवाहिकेद्वारे थेट आगार प्रमुखाच्या कार्यालयासमोर ठेवून जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह हलवण्यास नकार दिला.

सदरील घटनेची माहिती मिळताच पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली तसेच तपास योग्य दिशेने करून जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले त्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह अंत्यसंस्कार साठी घेऊन गेले. सदरील घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## जिल्हा रुग्णालयाच्या वाढीव इमारतीच्या कामात २५ महिन्यांचा बेकायदेशीर विलंब

### विनायक कन्स्ट्रक्शनला 'काळ्या यादीत' टाकण्याची मागणी

### अधिकाऱ्यांच्या मिलीभगतीवर वंचित बहुजन आघाडीचे फुले वाहा आंदोलन

बीड । प्रतिनिधी




शासकीय जिल्हा रुग्णालय, बीड येथील वाढीव २०० खाटांच्या इमारतीच्या बांधकामासंदर्भात शासनाने प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर सन २०२१ मध्ये विनायक कन्स्ट्रक्शन, आंबेजोगाई यांना कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. कार्यारंभ आदेशात २४ महिन्यांत काम पूर्ण करण्याची अट होती. मात्र अंदाजपत्रकानुसार काम न करता, तसेच मुदतवाढ घेतली की नाही याबाबतही संशय निर्माण झाला आहे.

मुख्य अभियंता (सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर), अधीक्षक अभियंता (सार्वजनिक बांधकाम मंडळ, धाराशिव) आणि कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक एक, बीड) यांनी योग्यवेळी पाहणी केली नसल्याने, गुत्तेदार मनमानी पद्धतीने काम करत राहिला. परिणामी, २०२१ मधील आदेशानंतर आज २०२५ ला देखील हे काम पूर्ण झालेले नाही. २४ महिन्यांच्या मुदतीवर तब्बल ४९ महिने उलटून गेले असून २५ महिन्यांचा जाणीवपूर्वक विलंब झाला आहे.

या गंभीर विलंबासाठी गुत्तेदारावर दंडात्मक कारवाई करून काळ्या यादीत टाकणे आवश्यक होते. परंतु गुत्तेदार आणि अधिकाऱ्यांमधील 'अर्थपूर्ण संबंधांमुळे' अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. या निष्क्रीय भूमिकेचा निषेध करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीकडून थेट इमारतीखाली आंदोलन करण्यात आले. मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्या प्रतीकात्मक पुतळ्यांना दगडांना चिकटवून हार घालण्यात आले व फुलांचा वर्षाव करून निषेध नोंदवला गेला.

वंचित बहुजन आघाडीने स्पष्ट मागणी केली की, २५ महिन्यांच्या अतिरिक्त विलंबाबाबत विनायक कन्स्ट्रक्शनवर तात्काळ दंडात्मक कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकावे. यापूर्वीच बीडचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी जिल्हा रुग्णालयाला अचानक भेट देऊन, तेथील अनियमितांवर अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. त्याच पद्धतीने अजित दादा पवार यांनी या इमारतीला प्रत्यक्ष भेट देवून,

पान २ वर

## बीड शहर पोलिसांनी आणखी एक मोटर सायकल चोर पकडला

### २४ तासात पीडितास मोटरसायकल केली परत

बीड । प्रतिनिधी



बीड शहर पोलिसांनी गेल्या सात दिवसात पुन्हा एक मोटरसायकल चोर पकडला असून त्याच्याकडून चोरीस गेलेली मोटरसायकल ही परत मिळवली आहे. दि.०८/०९/२०२५ रोजी फिर्यादी श्रीराम नवनाथ भिसे मुक्काम पोस्ट तांदुळवाडी भिल्ल, मोटरसायकल अज्ञात चोरट्याने सुभाष रोडवरील सहेली या दुकानासमोरून चोरून नेल्याची तक्रार बीड शहर पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. मोटरसायकल चोरी होत असल्याची दखल या अगोदरच पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी घेतलेली आहे व त्यांनी सर्व पोलिसांना याबद्दल काम करण्याचे सूचना दिले आहेत.

या अनुषंगाने बीड शहर पोलीस सदैव कामगिरी करत आहे. अशा प्रकारची मोटर सायकल चोरी गेली आहे याची माहिती सोशल मीडिया वरून देण्यात आली होती. त्यातून टाकरवन तालुका माजलगाव या गावात अशोक मधुकर गरड वय ३२ वर्ष धंदा मजुरी, या माणसाने त्या वर्णनाची मोटर सायकल आणली आहे अशी त्या गावातून माहिती मिळाली होती. सोशल मीडियाचा यामुळे अशा प्रकारे चांगला उपयोग झाला असून या माध्यमातून या चोरास अटक करण्यात आली आहे आणि त्याच्याकडून चोरीस गेलेली मोटरसायकल जप्त करण्यात आली आहे. २४ तासात अशा प्रकारची मोटरसायकल जप्त करून ती फिर्यादी यांस आज दिनांक १२ ऑगस्ट रोजी परत केली आहे. यामुळे फिर्यादीने पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि पथकाचे आभार मानले आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस ठाणे बीड शहरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोह गहिनीनाथ बावनकर, पो.अं. राम पवार आणि मंगेश शिंदे यांनी वेगवान कारवाई करून पिडीताला दिलासा दिला आहे.

## कान नाक घसा तज्ञ डॉ. राहूल दुबालेनी केली ऊसतोड मजुराच्या चार वर्षाच्या मुलाच्या कानातील खडा काढत यशस्वी शस्त्रक्रिया

## तीस हजार रुपया खर्च डॉ. राहुल दुबालेंमुळे वाचला; ऊसतोड मजूर आनंदाने भारावून गेला









बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या बीड जिल्ह्यामध्ये अनेक आरोग्याच्या समस्या असतील किंवा वेगवेगळे अडीअडचणी असतील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पैसा मेहनत केली तेव्हाच पाहायला मिळतो. रात्रंदिवस उसाच्या फडामध्ये ऊसतोड तोडणारे नवरा बायको जेव्हा दिवसभर ऊस तोडतात तेव्हा रात्रीच्या वेळेस त्यांच्या मुलाला २४ तासातून दोनदा परिवार जगण्याचं साधन खरेदी करून आपला उदरनिर्वाह करतात पण यामध्येच प्रामुख्याने पाहिले तर दवाखान्याची अडचण आली तर ऊसतोड मजुराला मुकादमा कडून उचल घेऊनच आपल्या परिवारातील सदस्यांचा जीव वाचवावा लागतो. यातच एक लहान साडे तीन वर्षांचा मुलगा वेदना सहन करत होता. गेल्या दोन महिन्यापासून तीस हजार रुपयांचा खर्च असलेल्या ऊसतोड मजुराच्या मुलाच्या कानाच्या शस्त्रक्रियेवर बीड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक संजय राऊत अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक संतोष शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कानात घसा तज्ञ डॉ. राहुल दुबाले यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली.

खाजगी दवाखान्यामध्ये ऊसतोड मजूर असलेले बाबासाहेब बबन भिसे यांना ३० हजार रुपये खर्च सांगितला होता साडेतीन वर्षाचा लहान असलेला मुलगा याच्या दोन्ही कानामध्ये लहान मुलांसोबत खेळत असताना वाळूचे खडे गेले होते. खडे खूप मोठे होते कान टोकरण्यात नंतर वेगवेगळ्या दवाखान्यामध्ये

पान २ वर

# मोडकळीस आलेल्या शाळांकडे पालकमंत्र्यांचे दुर्लक्ष; १५ ऑगस्टला अजितदादांना काळे झेंडे!

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या ९४ शाळांना अजूनही इमारत नाही, तर ३८१ शाळांमधील तब्बल ६०७ वर्गखोल्या मोडकळीस आल्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. विद्यार्थी अगदी जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन करत आहेत तर छताचा भाग कोसळुन विद्यार्थी जखमी झाल्याच्या घटना घडत आहेत. शिक्षण विभागाने १४ कोटी ८५ लाख रुपयांचा प्रस्ताव सादर करून दोन वर्षे उलटली, पण निधी अद्याप मंजूर झालेला नाही. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी वारंवार निवेदने, आंदोलने करूनही पालकमंत्री अजित पवार यांनी लक्ष न दिल्याने अखेर १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन ध्वजारोहणाच्या वेळी बीड दौऱ्यावर आलेल्या अजित पवार यांना काळे झेंडे दाखवून निषेध करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांना देण्यात आले आहे. ८ महिन्यांत ज्ञानमंदिरांना निधी द्यावा अजितदादा बीडची बारामती करा विमान उड्डाण आंदोलन आदी ३ वेळा लक्ष्यवेधी आंदोलने करूनही निधी न दिल्यामुळे आम्हाला काळे झेंडे दाखवण्याशिवाय पर्याय नाही, असे डॉ. ढवळे यांनी स्पष्ट केले.



## अहिल्याबाई होळकरांचे कार्य हे समाजासाठी प्रेरणा देणारे आहे : प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर

**बीड । प्रतिनिधी**



येथे महिला कला महाविद्यालयात दिनविशेष समिती द्वारा अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर, दिनविशेष समिती प्रमुख डॉ. वर्षा कुलकर्णी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमा अभिवादनाने झाली.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, होळकर घराण्याची धुरा सांभाळ त त्यांनी आपल्या राज्याची यशस्वीपणे काळजी घेतली अहिल्याबाईंनी आपल्या कारकिर्दीत अनेक धर्मशाळा, मंदिर, रस्ते, विहिरी, तलाव बांधले त्याचबरोबर अनेक मंदिराचा जिर्णोद्धार केला. अहिल्याबाईंच्या या सामाजिक कार्यामुळेच त्यांना पुण्यश्लोक तसेच राजमाता असे सन्मानाने म्हणत असत. अहिल्याबाई होळकर या उत्तम प्रशासक होत्या. अहिल्याबाई होळकर एक उत्तम न्याय प्रशासक म्हणून ओळखल्या जात. महिला आणि पुरुष यांच्यात त्यांनी त्याकाळात कधीच भेदभाव केला नाही, त्यानी राज्यात न्यायव्यवस्था मजबूत केली आणि लोकहित जपले, म्हणूनच अहिल्याबाई होळकर यांचे कार्य समाजासाठी प्रेरणा देणारे आहे असे मार्गदर्शन उपस्थितांना केले. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थिनी, प्राध्यापक आणि उच्च माध्यमिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार दिनविशेष समितीच्या डॉ. वर्षा कुलकर्णी यांनी केले.

## भक्तीभावनेने भगवंताला शरण गेल्यावर भगवंत संकटाचे निरसण करतो : सिद्धेश्वर महाराज

**परळी । प्रतिनिधी**



परळी येथे श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळया अंतर्गत श्रीमद् भागवत कथेच्या दुसर्या दिवसाची कथा सांगतांना मानवांच्या जीवनातील दु:खाचे समुळ निरसण करण्यासाठी मानवाने भगवंताला अनंन्य भक्तीभावाने शरण गेल्यास भगवंत भक्तांच्या सर्व संकटाचे निरसण करतो, असे प्रतिपादन भागवताचार्य ह.भ.प. सिध्देश्वर महाराज शास्त्री यांनी कथेचे दुसरे पूष्प गूंफतांना सांगीतले. भागवत कथेच्या दुसर्या दिवसाची महाआरती राष्ट्रवादी कॉग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, माजी ऊपनगराध्यक्ष रविंद्र परदेशी, माजी नगरसेवक जालींदर नाईकवाडे, वारकरी मंडळाचे प्रदेशाध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर कोकाटे महारांज यांच्या हस्ते भागवत कथेची आरती करण्यात आली.

श्री नर्मदेश्वर गुरुकुल येथे श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळयाचे मोठया ऊत्साहात आयोजन करण्यात आले आहे. यातील भागवत कथेत कथाप्रवक्ते हभप सिद्धेश्वर महाराज शास्त्री यांनी दुसऱ्या दिवसाची कथा सांगतांना महाराज यांनी सांगीतले की, पाच पांडव भगवंताला अनन्यभावे शरण गेल्यामुळे कौरव शंभर असुनहि पाच पांडवांच्या केसालाही धक्का लावू शकले नाहित. भागवतभक्त परिक्षितीची माता ऊत्तरा भगवंताला शरण गेल्यामुळे भगवंताने गर्भातच परिक्षीतीचे रक्षण केले. मानवानेही सदैव भगवंताला अनन्यभावे शरण गेल्यास मानवावरील प्रत्येक संकटाचे भगवंत निरसण करतो असे प्रतिपादन केले. कथेच्या प्रारंभी ग्रंथाची पुजा श्रीकृष्ण मीत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार डाके व सौ.शारदा डाके यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी आरतीसाठी ऊपस्थीत श्री वैजनाथराव सोळंके, रविंद्र परदेशी, जालींदर नाईकवाडे, ह.भ.प. रामेश्वर कोकाटे महाराज आदी मांन्यवरांचा सत्कार श्री नरमदेश्वर गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.अर्जुम महाराज शिंदे शास्त्रीजी यांनी शाल व श्रीफळ देऊन केले. यावेळी या परिसरातील असंख्य भावीकभक्त यावेळी मोठया संखेने ऊपस्थीत होते.

## सत्यशोधक पुरस्काराने सौ.सीमा ओस्तवाल यांच्या कार्याचा होणार सन्मान

### शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम गोरगरीब समाजातील घटकांना उर्जा देणारा : संजय मोरे





**गेवराई । प्रतिनिधी**

शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम अत्यंत सुंदर असा उपक्रम असून, गोरगरीब विद्यार्थ्यांना नवी उर्जा देणारा आहे. सामाजिक कार्यात सक्रिय राहून, शालेय साहित्य वाटपाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानदीप पेटवून, गुरू आनंद महिला प्रतिष्ठानने सामाजिक भान राखले आहे. अशा स्तुत्य उपक्रमाला समाजाने तन मन धनाने हातभार लावला पाहिजे, असे प्रतिपादन शिक्षण विस्तार अधिकारी संजय मोरे यांनी येथे बोलताना केले आहे. मंगळवार ता. १२ रोजी गेवराई येथील जिल्हा परिषद शाळेत, गुरू आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. गुरू आनंद महिला प्रतिष्ठान बीड व प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई शहरातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

व्यासपीठावर शिक्षण विस्तार अधिकारी संजय मोरे गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती सीमाताई ओस्तवाल, मुख्याध्यापक राजकुमार पोपळघट, कन्या प्रशालेचे मुख्याध्यापक विष्णू सोळुंके, पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, ज्येष्ठ पत्रकार विनोद नरसाळे, पत्रकार ॲड.हारूण शेख यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बापूसाहेब तारुकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी गेवराई शहरातील जिल्हा परिषदच्या सर्व शाळा सहभागी झाल्या होत्या. सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना एकूण ५० हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. गुरू आनंद महिला प्रतिष्ठान व प्रयास फाउंडेशनच्या वतीने तालुक्यातील व जिल्ह्यातील अनेक शाळांना जवळपास एक कोटी रुपयांची शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आलेले आहे. समाजातील मागास घटकातील मुले शैक्षणिक प्रवाहात यावीत ती टिकावीत व जिल्ह्याचा शैक्षणिक विकास व्हावा, या उद्देशाने हा कार्यक्रम गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेला होता. विष्णू सोळुंके, राजकुमार पोपळघट, शिवाजी झेंडेकर यांनी ही आपले विचार व्यक्त केले.

श्रीमती सीमाताई ओस्तवाल यांनी सांगितले की, सामाजिक कार्य आपली बांधिलकी आहे. गोरगरीब घटकांना होईल तेवढी मदत करत आलो आहोत. या पुढे ही हा उपक्रम सुरूच राहणार आहे. पंधरा वर्षापासून जिल्ह्यामध्ये शैक्षणिक साहित्य वाटप, कोरोना काळात धान्य किराणा वाटप तसेच दुष्काळग्रस्तांना मदत अशा प्रकारचे उपक्रम प्रतिष्ठानने राबविले आहेत. आतापर्यंत जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये या प्रतिष्ठानने शैक्षणिक साहित्य वाटप केल्याचे त्यांनी सांगितले तसेच येणाऱ्या काळातही ही चळवळ अशीच चालू राहील अशा प्रकारची ग्वाही दिली. सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. जिल्हा परिषदच्या सर्व शाळातील मुले ही गरजवंत व गरीब परिस्थितीतील आहेत. विद्यार्थ्यांनी देखील सीमाताई यांचे आभार मानले. याप्रसंगी जिल्हा परिषद जायकवाडी वसाहत गेवराई या केंद्रातील सर्व शिक्षक बंधू, भगिनी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन कवियत्री राजश्री मिसाळ, श्रीमती केशर शिंदे यांनी केले. उपस्थितांचे आभार श्रीमती मयुरी भंडारे यांनी मानले.

## विद्युत तंत्रज्ञ अर्जुन थोरात यांचा विवाह सोहळा उत्साहात पार

**दौलावडगाव । प्रतिनिधी**



दौलावडगावसह संपूर्ण तालुक्यात आपल्या कार्यातून, जिव्हाळ्याच्या वर्तनातून आणि मैत्रीपूर्ण स्वभावातून सर्वांच्या मनात घर करून बसलेले व्यक्तिमत्त्व, महावितरण सेवेत विद्युत तंत्रज्ञ पदावर कार्यरत अर्जुन थोरात यांचा विवाह सोहळा मंगळवारी मोठ्या उत्साहात पार पडला. पाथर्डी तालुक्यातील संत गव्हाणे बाबांच्या पावन भूमीत असलेल्या अल्हणवाडी येथे हा सोहळा पार पडला. पारंपरिक ढोल–ताशांच्या गजरात, वाजत–गाजत आणि मंगल वाद्यांच्या सुरावटीत वरात काढण्यात आली. नातेवाईक, मित्रपरिवार, मान्यवर, गावकरी आणि पाहुण्यांच्या उपस्थितीत पारंपरिक पद्धतीने विवाह विधी संपन्न झाला. चि. अर्जुन थोरात आणि चि.सौ.का. अक्षदा यांच्या विवाह प्रसंगी तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, महावितरण सेवेतील अधिकारी–कर्मचारी, पत्रकार बांधव, तसेच सगे–सोयरे मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. पाहुण्यांनी नवविवाहित दांपत्यास आयुष्यभर सुख–समृद्धी, प्रेम आणि आनंदाने नांदावे अशा शुभेच्छा दिल्या. विवाह सोहळ्याची विशेषता म्हणजे पाहुण्यांचे आत्मीय स्वागत, प्रेमळ आदरातिथ्य, पारंपरिक संस्कृतीचे दर्शन आणि आनंदी वातावरण. संपूर्ण गावकरी एकत्र येऊन सोहळ्याची शोभा वाढवली.

## बीड येथे उद्या होणाऱ्या तिरंगा रॅलीमध्ये मोठया संख्येने सामील व्हावे : अप्पासाहेब झोडगे पाटील

**बीड । प्रतिनिधी**



ऑपरेशन सिंदूर च्या विजय यशानंतर भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून संपूर्ण भारतात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता बीड शहरामध्ये भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही तिरंगा रॅली महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा पासून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापाशी समारोप होणार आहे. तरी मोठया संख्येने नागरिकांनी या तिरंगा रॅली मध्ये सामील व्हावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे बीड तालुका सरचिटणीस आप्पासाहेब झोडगे पाटील यांनी केले आहे.

## कालिकादेवी महाविद्यालयात जागतिक स्तनपान सप्ताह

**शिरूर कासार । प्रतिनिधी**



आरोग्य सेवा केंद्र कालिकादेवी महाविद्यालयाच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कानोबाची वाडी येथे जागतिक स्तनपान सप्ताह साजरा करण्यात आला. या निमित्ताने प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना स्तनपानाचे महत्त्व सांगितले.

यावेळी बोलताना प्रा अफरोज सय्यद म्हणाल्या की, स्तनपानाचे संरक्षण, प्रोत्साहन आणि समर्थन करणे काळाची गरज आहे. कारण स्तनपानामुळे बाळांचे आणि मातांचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. प्रत्येक वर्षी १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधीत जागतिक स्तनपान सप्ताह एक जागतिक अभियान म्हणून साजरा केला जातो. आठवडाभर चालणाऱ्या या आठवड्यात आई आणि मूल या संदर्भाने मार्गदर्शन केले जाते. यावेळी प्रा. सय्यद अफरोज अहमद व डॉ. चेतना डोंगरीकर यांनी कान्होबाची वाडी या गावात महिलांच्या घरी भेट देऊन गर्भवती महिलांना मार्गदर्शन व समुपदेशन केले तसेच स्तनपानाचे फायदे विषयक माहिती देऊन पत्रिकांचे वाटप करण्यात आले. अध्यक्ष समारोप करताना प्राचार्य डॉ विश्वास कंधारे म्हणाले की, आजच्या किशोरी उद्याच्या माता असतात. त्यामुळे सशक्त आणि सदृढ किशोरी सशक्त माता होणे महत्वाचे आहे. याच उद्देशाने महाविद्यालय व आरोग्य सेवा केंद्र कार्यरत असल्याचेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रमेश लांडगे यांनी तर आभार प्राथमिक शिक्षक तांबे सर यांनी मानले. यावेळी शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी, आंगणवाडी सेविका सुजाता जाधव, महिला ग्रामस्थ व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

## तीस हजार रुपया खर्च डॉ. राहुल दुबाळे मुळे वाचला ऊसतोड मंजुर आनंदाने भारावून गेला

दाखवले तेव्हा त्या बाळाच्या कानातून रक्त येऊ लागले यातच त्यांना बीड जिल्हा रुग्णालयामध्ये डॉ. राहुल दुबाले यांनी संबंधित साडेतीन वर्षाच्या बालकाची कानाची तपासणी केल्यानंतर त्याला बीड जिल्हा रुग्णालयातील वार्ड क्रमांक ५० मध्ये ॲडमिट करण्यात आले. यावेळी त्यांनी योग्य मार्गदर्शन करून ऊसतोड मजूर असलेले बाबासाहेब भिसे यांना धीर देत काळजी करू नका, मी ऑपरेशन करतो असे सांगितले. यावेळी महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष दीपक थोरात हे संबंधित पेशंटला ॲडमिट करून डॉक्टर दुबाले यांना विनंती केली व ती विनंती डॉक्टर दुबाले यांनी विद्यमान जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक संतोष शहाणे यांच्यासमोर संबंधित रुग्णाची परिस्थिती सांगितली.

त्यावेळी या रुग्णावरती आज बीड जिल्हा रुग्णालयातील ऑपरेशन थेटर मध्ये काना घसा तज्ञ डॉ राहुल दुबाले यांनी यशस्वी शस्त्रक्रिया करत त्याचा कानातील खडे बाहेर काढले व पेशंटच्या चेहऱ्यावर एकच हसू फुलले व पेशंट असलेल्या लहान मुलगा संघर्ष बाबासाहेब भिसे राहणार खेर्डावाडी तालुका गेवराई जिल्हा बीड यांच्या वेदना कमी झाल्या. ही शस्त्रक्रिया करत असताना डॉ. राहुल दुबाले वार्ड क्रमांक ५० मधील सुगडे इन्चार्ज शितल जायभाय सिस्टर प्रीती कांबळे सिस्टर खोपडे सिस्टर ऑपरेशन थिएटर डॉक्टर राहुल गोकुळराव दुबाले (MS ENT), ऑपरेशन थिएटर इन्चार्ज जे पी उबाळे, स्टाफ नर्स मिता लांबोरे व इतर स्टाफ ज्यांनी मदत केली ते श्री लेंगरे विनोद, श्री श्रीराम माने, बेदरे मामा १९ नबर चे लेगरे यांनी सहकार्य केले. आज सबंधित बाळाला डिस्चार्ज करत सुखरूप घरी पाठवले याबद्दल डॉक्टर राहुल दुबाले यांच्या वरती रुग्णालयातील अनेक कर्मचारी अधिकारी सामाजिक कार्यकर्ते व पेशंटचे नातेवाईक यांच्याकडून आभार व्यक्त करून त्यांच्यावरती शुभेच्छांचा अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### जिल्हा रुग्णालयाच्या वाढीव इमारतीच्या कामात २५ महिन्यांचा बेकायदेशीर विलंब

मुदतीत काम झाले आहे का नाही याची स्वत: पाहणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

या आंदोलनावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा महासचिव खंडू देवराव जाधव, सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष रोहन मगर, महिला जिल्हा उपाध्यक्ष पुष्पाताई तुरुकमाने, सह संघटक अर्जुन जंवजाळ, प्रसिद्धी प्रमुख राजेश कुमार जोगदंड, तालुका अध्यक्ष किरण वाघमारे, शहर अध्यक्ष लखन जोगदंड, शहर महासचिव संदीप जाधव, कुमार साबळे, मिलिंद सरपते, प्रेम कांबळे, आकाश साबळे, विवेक मस्के व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नभांगण फाऊंडेशन मुंबई विद्यमाने जि.प. पाचेगांव शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचे प्रस्ताविकरण

**परिसरातील ९५१ विद्यार्थांना करणार शालेय साहित्य वाटप**

**कडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मोजे पाचेगाव या ठिकाणी दि १४ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी सकाळी १०वाजता जि.प. शाळा पाचेगांव येथे ९५१ विद्यार्थ्यांना नभांगण फाऊंडेशन यांच्या विद्यमाने शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड व अध्यक्षस्थानी रहमान मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड हे लाभणार आहेत. या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती व प्रमुख अतिथी म्हणून सिनेअभिनेत्री श्रेया सचीन पिळगांवकर नभांगण फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा सत्यशोधक चित्रपटातील सावित्रीबाई यांच्या भूमिकेसाठी २०२५ च्या फिल्म फिअर अवार्ड विजेत्या सिने अभिनेत्री राजश्रीताई देशपांडे उपस्थित राहणार आहेत.



पाचेगाव परिसरात गेल्या चार वर्षापासून नदी खोलीकरण रुंदीकरणाद्वारे नंदनवन बनवण्याचे काम फाउंडेशन द्वारे राजश्रीताईंनी केले आहे. पाण्याबरोबर त्यांचे शिक्षण, महिलांचे आरोग्य या विषयात काम केले आहे. या अगोदरही त्यांनी जिल्हा परिषदच्या तीन शाळेचे अद्यावत बांधकाम करून दिले आहे. नभांगन फाउंडेशनव्दारे श्री कानिफनाथ नदीचे खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामाची पाहणी करण्यासाठी गेल्या महिन्यात आल्या असता जिल्हा परिषद पाचेगाव शाळेला त्यांनी भेट दिली. शाळेचे अंदाजे १९६५ ला इमारतीचे बांधकाम झाल्यामुळे इमारत मोडकळीस आली आहे.

शाळाची ही अवस्था पाहून त्यांनी शाळाला नवीन खोल्या बांधकाम करून देण्याचा मानस व्यक्त केला.

प्रशासकीय पुर्ततेसाठी सर्व कागदपत्रासह प्रस्ताव जिल्हा परिषद बीडला मान्यतेसाठी पाठवला आहे. तरी शाळेच्या नवीन बांधकामाच्या पुढील नियोजनासाठी व शालेय साहित्य वाटपासाठी त्या उपस्थित राहणार आहेत. विशेष उपस्थिती सुमंत पांडेसाहेब यशदा डायरेक्टर पुणे व अतुल कुलकर्णी महाराष्ट्र टाईम्स जिल्हा प्रतिनिधी बीड, ग.शि. गेवराई धनंजय शिंदे, श्रीमती प्रियंका घोडके मंडळ अधिकारी पाचेगाव हे उपस्थितीत राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी परिसरातील शिक्षक, शिक्षणप्रेमी विद्यार्थी, पालक, हितचिंतक, परिसरातील व ग्रामस्थांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा परिषद शाळा पाचेगाव व शाळा व्यवस्थापन समिती जिल्हा प्राथमिक शाळा पाचेगावतर्फे करण्यात आले आहे.

## समाजातील प्रत्येक घटकांसाठी संघर्ष करणाऱ्या नेत्या सुशिलाताई मोराळे



बुद्ध, फुले, शिव, शाहू, आंबेडकर अण्णाभाऊ, माता जिजाऊ, माता रमाई माता सावित्री यांचे विचार प्रत्यक्षात जगणाऱ्या शेतकरी, कष्टकरी, कामगार बहुजन, अबला, महिला सामान्यातील सर्वसामान्य घटकांसाठी आणि त्यांच्या प्रश्नासाठी प्रश्नासाठी एनीटाईम रस्त्यावर उतरणाऱ्या नेत्या... समाजातील प्रत्येक घटकांसाठी संघर्ष करणाऱ्या नेत्या... देशाच्या ओबीसी चळवळीतील सक्षम खांदे, दिग्गज, निर्भिड, नेतृत्व म्हणून ओळख असणाऱ्या नेत्या... महार, मांग चांभार, पारधी, मांग गारुडी, गोसावी लमानी, वडरे, तेली तांबोळी, साळी माळी, वंजारी, कुंभार, सुतार, लोहार आणि गरीब मराठा यासारख्या असंख्य जातीतील गोरगरीब कुटुंबातील मुलींचे मातृत्व आणि पितृत्व स्वीकारणाऱ्या सुशीला ताई... शिक्षणाची गंगा जिल्ह्याच्या ने कोपऱ्यात वाडी वस्ती तांडा डोंगर दर्यात झोपडपट्टी दुर्मिळ वस्तीत दुर्गमती दुर्गम भागात पोहोचविणाऱ्या आधुनिक सावित्री प्राध्यापक सुशीला ताई मोराळे यांनी आपल्या शैक्षणिक क संस्था आणि शाळांचे नावे अरुणा असफ अली राष्ट्रसंत गाडगेबाबा माता जिजाऊ साने गुरुजी शाहिद भगतसिंग सुभाष चंद्र बोस संत तुकाराम आय वंचित उपेक्षित आदिवासींचा देव एकलव्य यासारख्या महापुरुषांची नावे देऊन समाज पालक विद्यार्थी यांच्याकडे आदर्श उभा केला आणि त्यातून हजारो लाखो विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येतेच... त्यांच्या शिक्षण संस्था शिक्षण घेणारे विद्यार्थी आज तहसीलदार डी वाय एस पी पीआय पोलीस डॉक्टर इंजिनिअर नामांकित वकील शिक्षक क्लार्क लिपिक अशा अनेक पदावरती कार्यरत आहे तसेच शेकडो तरुणांना ब्राह्मण मराठा पासून ते अनुसूचित जाती जमाती मुस्लिम इतर मागास अनेक जाती धर्मातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना नोकऱ्या देऊन त्यांच्या उपजीविका चालून उदरनिर्वाह करत आहेत त्यांचे कुटुंबाचा आधार झाले आहे.



देशभरात मॅडमचे अनुयायी आहेत. त्यांच्या पुरोगामी विचारांचे, डाव्यासरणीचे महाराष्ट्रातच नव्हे तर बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, छत्तीसगड, झारखंड, उत्तर खंड, गोवा गुजरात आणि भारताची राजधानी दिल्ली पर्यंत त्यांच्या विचारांचे निष्ठावंत कार्यकर्ते आढळतात. उभ्या आयुष्यात विचारांची लढाई लढणाऱ्या सतत रस्त्यावरचा संघर्ष करणारे संघर्ष कन्या अतिशय ग्रामीण भागातून सामान्य कुटुंबातून येऊन आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवतात म्हणून त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना कोटी कोटी शुभेच्छा !

**संतोष काळे**

# नवनियुक्त सीओ यांना बीड शहर बचाव मंचने शहराच्या समस्या दिल्या अवगत करून

## शहर नागरी समस्यांच्या विळख्यात – बीड शहर बचाव मंच शिष्टमंडळाने घेतली सिओची भेट

**बीड । प्रतिनिधी**

नगर परिषद, बीडचे नव्याने रुजू झालेले मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना समक्ष भेटून शहरातील रस्ते, पाणी, स्वच्छता, वीज, मोकाट जनावरे, हायवे वर युटर्न तयार करा, रहदारी, अतिक्रमणे, अशा सर्वच समस्या 'बीड शहर बचाव मंच' चे पदाधिकारी यांनी मांडल्या. तपशीलवार चर्चा झाली. रस्त्यांचे काम वगळता, बाकी समस्यांचे निराकरण प्राधान्याने, तातडीने करण्याचे आश्वासन दिले आहे. शहरवासियांच्या वतीने त्यांचे 'मंचा'ने व विविध जन संघटनांनी स्वागत केले व निवेदन दिले.



प्राचार्य डी.जी.तांदळे, मार्गदर्शक, बीड शहर बचाव मंच शहरातील सर्वच भागातील रस्त्यांची खड्डे तात्काळ बुजवण्यात यावेत. परतीच्या पावसाच्या अगोदर, शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर सर्वच भागांमध्ये जागोजाग निर्माण झालेले कचऱ्याचे डिगारे उचलण्याची तसेच नालेसफाईची मोहीम राबवण्यात यावी व तुंबलेल्या नाल्या स्वच्छ करून मोकळ्या करण्यात याव्यात, जेणेकरून आपल्याला ऐनवेळी पावसामुळे घडणारा अनर्थ तसेच नागरिकांची होणारी तारांबळ टाळता येईल. शहरातील सर्वच भागांमध्ये तसेच मुख्यत्वे करून विस्तारित भागांमध्ये पथदिव्यांचा फार मोठा तुटवडा आहे. बऱ्याच भागामध्ये पथदिव्यां अभावी रात्री नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागतो. प्रामुख्याने महिला-भगिनी जेष्ठ नागरिक यांना टवाळखोर लोकांसह कुत्रे व मोकाट जनावरांचा ही त्रास मोठ्या प्रमाणावर सहन करावा लागत आहे. तरी अशा सर्व परिसरांमध्ये पथदिव्यांची संख्या वाढविण्यात यावी व तातडीने पथदिवे बसविण्यात यावेत. बीड शहर बचाव मंचाच्या वतीने सर्वे करून शहरातील व विस्तारित शहरातील सर्वच भागातील पथदिवे लावण्याच्या गरजेनुसार यादी नगरपरिषद विद्युत विभागासाठी सादर करत आहोत. बीड शहराला होणारा पाणीपुरवठा नियमितपणे प्रत्येक पाच दिवसाला करण्यात यावा, नगरपरिषद महसूल कर वसुली विभागातील कर्मचाऱ्यांच्या कडून नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणी येत असून या सर्व अडचणी तातडीने दूर करण्यात याव्यात. कर भरणे वसुली प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यात याव्यात.

नागरिकांची होणारी गैरसोय समजावून घेऊन दूर करण्यात यावी व सोयीस्कर पद्धतीने कर भरून घेण्यात येण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात बंद भागातील घंटागाड्या तसेच कचरा उचलणारे ट्रॅक्टर्स तात्काळ चालू करण्यात यावेत. मोकाट कुत्रे व मोकाट जनावरे यांच्यामुळे शहरांमध्ये अपघाताचे प्रमाण व ट्रॅफिक जामचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे तरी मोकाट कुत्रे व जनावरे यांचा तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा, नगर रोड वरील रस्ता दुभाजकांमध्ये यू टर्न ठेवण्यात येण्याच्या संदर्भामध्ये नगरपरिषद प्रशासनाने ही योग्य ती पावले उचलावीत, यासाठी बीड शहर बचाव मंच शिष्टमंडळाने बीड न.प.चे सिओ यांची भेट घेऊन चर्चा करून समस्या सोडवण्यासाठी आग्रही मागणी केली आहे.

# महाराष्ट्र आधार सेनेच्या सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा : आकाश लोखंडे

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त सत्यशोधक पुरस्काराचे वितरण केले जाणार

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आधार सेनेच्या वतीने दिनांक १७ ऑगस्ट रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे सत्यशोधक पुरस्कार हा समाजातील शैक्षणिक, राजकीय, कला विज्ञान, साहित्य, क्रीडा, समाजसेवा, इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मागील आठ वर्षापासून दरवर्षीप्रमाणे या सत्यशोधक पुरस्काराचे वितरण केले जाते.

सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजक महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष माननीय दीपक भाऊ थोरात यांनी केलेले असून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना हा पुरस्कार दिल्या जातो दरवर्षी प्रमाणे येत्या दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड या ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. अठरापगड जातीतील लोकांसाठी अहोरात्र काम करत असताना दीपक भाऊ थोरात यांनी लोकांच्या वेदना समजून घेऊन त्यांच्यासाठी आपले जीवन अर्पण केलेले आहे. दवाखान्यातील, पोलीस स्टेशन मधील, तहसील, पंचायत समिती किंवा इतर कुठलेही काम असो दीपक भाऊ थोरात निस्वार्थपणे कोणाकडून एक रूपयाची अपेक्षा न ठेवता करतात, समाजातील प्रश्न सोडवतात त्यामुळे काम करणाऱ्या माणसाच्या मागे खंबीरपणाने उभे राहिले पाहिजे जेणेकरून त्या माणसाला लढण्यासाठी अजून बळ मिळेल ऊर्जा मिळेल.



तसेच इतर लोकांनी पण आपले जीवन अर्पण केलेले असून त्यांच्या या कार्याला वाव मिळावा व त्यांच्या कार्याचे कौतुक व्हावे यासाठी दीपक भाऊ थोरात यांनी या सत्यशोधक पुरस्काराची संकल्पना राबवून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या लोकांना या पुरस्कारामुळे अजून बळ मिळेल व कौतुकाची थाप मिळेल या उद्देशाने हा पुरस्कार दिला जाणार आहे या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार असून या कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे अशी आवाहन आकाश लोखंडे यांनी केले आहे.

# सकाळी निवेदन दिले दुपारी प्रश्न लागला मार्गी

## १५ आँगस्ट रोजी करण्यात येणाऱ्या निषेध लोटांगणला स्थगिती : रहेमान सय्यद

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील साबलखेड कडा आष्टी रस्त्यांचे काम दोन वर्षांपासून चालू असून या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी गटारी बनवतांना गटारीला पावसाचे पाणी जाण्यासाठी जागोजागी चार-चार इंचाची छिद्रे ठेवली होती. परंतु रस्ता बनवतांना ते सगळेच्या सगळे छिद्रे रस्त्यात बुजून टाकली. परिणामी दावलमलिक (शादवल) दर्गा समोर ५० फुटापेक्षा जास्त लांबीचे व २० फुटाच्या आसपास रूंदीत पावसामुळे कायमच चिखल - पाण्याचे ढव साचून राहत होते. त्यामुळे ये-जा करतांना कसरत करावी लागत होती. तर घसरून पडण्याची भिती,



अपघाताची भिती यावर उपाययोजना करावी म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यद यांनी वेळोवेळी अभियंता भोपळे सह संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना फोटो व्हिडिओ पाठवून संपर्क करून यावर लवकर उपाययोजना करावी म्हणून विनंत्या केल्या होत्या परंतु दखल घेतली नाही. म्हणून १२ आँगस्ट २०२५ रोजी लेखी निवेदन देऊन आजपर्यंत दखल घेतली नाही याचा निषेध म्हणून १५ आँगस्ट २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ११:३० वाजता दर्गा समोर साचलेल्या चिखल-पाण्यात भोपळा, बेशरम घेऊन १५ मिनिंटे लोटांगण घेत निषेध व्यक्त करणार असल्याचे निवेदन १२ आँगस्ट रोजी सकाळी ११ वाजता दिले आणि चमत्कार झाला. निवेदन सकाळी ११ वाजता दिले आणि काम दुपारी ३ वाजता करून दिले. इतक्या दिवसांपासून जो प्रश्न मार्गी लावण्यासाठी अभियंता व संबंधित कर्मचाऱ्यांना विनंती करण्यात येत होती. वृत्तपत्रातून याप्रकरणी बातम्या छापून आल्या होत्या तर दखल घेतली असे दाखवत ग्रेडर वाहनने चिखल पाणी हटवत थातूरमातूर काम करून वेळ काढूपणा काम केले होते. परंतु एका निवेदनाद्वारे सकाळी विनंती केली आणि त्या निवेदनाची दखल घेत दुपारी प्रश्न मार्गी लावला म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यद यांनी निवेदन दिलेल्या सर्व अधिकाकाऱ्यांना निवेदनाची दखल घेऊन काम करून दिले प्रश्न मार्गी लावला म्हणून १५ आँगस्ट २०२५ शुक्रवार रोजी होणाऱ्या निषेध लोटांगणला स्थगिती देत असल्याचे लेखी कळविले आहे.

# पत्रकार बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे यांना सत्यशोधक पुरस्कार जाहिर!

## अभिनंदनिय : उल्लेखनिय कार्याची दखल

**माजलगाव । प्रतिनिधी**





महाराष्ट्र आधार सेना सामाजिक संघटना व दैनिक महाराष्ट्र आरंभ यांच्या संयुक्त विद्यमानाने यांच्याकडून विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तींना लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी सत्यशोधक पुरस्कार देवून गौरव केला जातो. यावर्षीचा सत्यशोधक पुरस्कार पत्रकार बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे यांना घोषित झाला आहे. हा पुरस्कार मा.पालकमंत्री धनंजय मुंडे, मा.आ. अमरसिह पंडित यांच्या सह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे येत्या रविवार (दि.१७) रोजी प्रदान केला जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र आधार सेना संघटना चे संस्थापक अध्यक्ष संपादक दिपक थोरात यांच्याकडून देण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील माजलगाव येथेल रहिवाशी असलेले पत्रकार बाळासाहेब आडागळे हे गेल्या पंधरा वर्षीपासून पत्रकारीतेच्या माध्यामातून आपल्या लेखणीने अनेक अन्यायाला वाचा फोढण्याचे काम केले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना पत्रकार क्षेत्रातील राज्यस्तरीय सत्यशोधक पुरस्काराने प्रदान करण्यात येणार आहे. तसेच कमी कालावधीत आपल्या अभिनयाच्या जोरावर उल्लेखनीय काम करणारी अभिनेत्री प्राची सोनवणे हिच्या कार्याची दखल घेत, त्यांना साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमीत्त कला क्षेत्रातील राज्यस्तरीय सत्यशोधक हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

अभिनेत्री प्राची हिने कला क्षेत्रात निभावलेली भूमिका अतिशय उल्लेखनिय आहे. दरम्यान सत्यशोधक पुरस्कार सोहळ्यास बीडचे मा. पालकमंत्री धनंजय मुंडे, गेवराई मतदार संघाचे मा.आ.अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र आधार सेना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, संपादक दिपक थोरात, उपसंपादक उद्धव आरे यांनी दिली आहे.

# वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीत पंकजा-धनुभाऊंना प्रचंड यश

## पवारांचे उमेदवार राजाभाऊ फड यांचे डिपॉजिट जप्त



**परळी । प्रतिनिधी**

वैद्यनाथ अर्बन बँकेच्या निवडणुकीचा निकाल काल जाहीर झाला. सर्वच्या सर्व १७ संचालक यात मोठे मतदिप्य घेऊन विजयी उमेदवाराचे मनपूर्वक अभिनंदन आणि खूप खूप शुभेच्छा,! लोकनेते मुंडे साहेबांना अभिप्रेत असणारा मार्गदर्शक कारभार व्यवस्थितपणे सुरू ठेवल आज विश्वास आहे. निकालानंतर माजी खासदार डॉक्टर प्रीतम ताई मुंडे आणि बँकेचे अध्यक्ष उपाध्यक्ष रमेश कराड यांच्यासह सर्व संचालकांनी गोपीनाथ गडावर नतमस्तक होऊन मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. या ठिकाणी डॉक्टर प्रीतम ताई यांनी सर्वांचे पहार घालून स्वागत केले. यानंतर या सर्व उमेदवारांनी निवासस्थानी येऊन माजी आई प्रज्ञाताई मुंडे यांची भेट घेतली व आभार मानले. आईने प्रत्येक विजय उमेदवार आला स्वतःच्या हाताने पेढा भरून सर्वांचे अभिनंदन केले. सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# महाराष्ट्र आधार सेना ऊसतोड कामगार संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी तुकाराम गायकवाड यांची निवड



**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील व्यंकटेश हॉल मध्ये महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष मा. दीपक भाऊ थोरात व आदींच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली यामध्ये तुकाराम गायकवाड यांची महाराष्ट्र आधार सेना ऊसतोड कामगार संघटनेच्या माजलगाव तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

यावेळी त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. तुकाराम गायकवाड यांनी ऊसतोड मजूर म्हणून काम करत आज ते वाहन मालक असून याविषयी त्यांना सखोल अभ्यास व माहिती झालेली आहे. तसेच ऊसतोड कामगार यांची कुठे कुठे पिळवणूक केली जाते, कामगारां वरील अन्याय अत्याचार, कामगारांचे प्रश्न, त्यांचे आरोग्य, ऊसतोडणीसाठी भाव किती असायला हवा ईत्यादी प्रश्नावर त्यांनी काम केलेले असून याचा भरपूर अनुभव आहे व ऊसतोड कामगारांची बाजू ते शासनदरबारी भक्कम पणे मांडतील त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवून ऊसतोड कामगार माजलगाव तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. यावेळी महाराष्ट्र आधार सेनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# एक पेड माँ के नाम उपक्रम आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

समर्थ विद्यालय शिरसमार्ग या शाळेत जागतिक पर्यावरण दिनापासून 'एक पेड माँ के नाम' ही संकल्पना सुरु करण्यात आली आहे. आईच्या नावाने एक झाड प्रत्येकाने लावणे असा या योजनेचा उद्देश असून पीएम मोदी यांनी या अभियानाला सुरवात केली आहे. येत्या सप्टेंबर २०२५ पर्यंत देशात ८० कोटी रोपे लावण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यानुसार 'एक पेड माँ के नाम' हे अभियान राबविण्यात येत आहे.



या मोहिमेचा एक भाग म्हणून समर्थ विद्यालय शिरसमार्ग ता गेवराई जि बीड या शाळेत १ऑगस्ट पासून मोहीम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना आपआपल्या घरी आईबरोबर प्रत्येकाने घरी अंगणात, शेतात, शाळेत एक झाड लावुन त्याचे संगोपन करण्यासाठी सांगितले. शाळेतील २६५ विद्यार्थ्यांनी आपआपल्या आईबरोबर घरी झाडे लावून ऑनलाइन पोर्टल वर फोटो अपलोड करून प्रमाणपत्र प्राप्त केले आहेत. या कार्यक्रमांतर्गत 'समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ' या संस्थेचे सचिव सुभाषराव पवळ यांच्या उपस्थितीत शाळेच्या आवारात वृक्ष लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक केसभट सर व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# आ.सुरेश धस यांनी केली भगवान रामेश्वराची महापूजा

## सौताडा येथे लाखो भाविकांनी घेतले भगवान रामेश्वराचे दर्शन

**आष्टी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील सौताडा येथे डोंगरदरीमध्ये असलेल्या भगवान रामेश्वराची तिसऱ्या सोमवारी आष्टी- पाटोदा- शिरूर चे आमदार सुरेश धस यांनी महापूजा केली. ही पूजा येथील पुरोहित पांडुरंग प्रभाकर देशमुख उर्फ पांडू देवा यांनी केली. बीड जिल्ह्यामध्ये बीड -नगर रोडवर पाटोदा तालुक्यामध्ये सौताडा हे गाव आहे. या ठिकाणी असलेल्या डोंगरदऱ्याच्या कपारीत सुंदर असे भगवान रामेश्वराचे मंदिर आहे. या ठिकाणी मोठा धबधबा असल्याने आणि वनविभागाने हा परिसर विकसित केल्याने अत्यंत सुंदर आणि रमनिय असे हे ठिकाण बनले आहे.



या ठिकाणी दर श्रावण सोमवारी यात्रा भरते. श्रावण महिन्यातील तिसरा सोमवार हा विशेष असतो. सोमवारी सकाळी ६ वाजता आष्टी-पाटोदा-शिरुरचे आमदार सुरेश धस, सौताड्याचे सरपंच बाळू घुले, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप काका जाधव यांनी भगवान रामेश्वराची महापूजा केली. या पूजेचे पुरोहित या देवस्थानचे प्रमुख पांडुरंग प्रभाकर देशमुख उर्फ पांडू देवा शास्त्री यांनी केले. यावेळी भाविकांनी दर्शनाला गर्दी केली होती. सोमवारी दिवसभर हा परिसर भाविकांनी फुलून गेला होता. या निसर्गरम्य ठिकाणी एरवी ही पर्यटकांची गर्दी असते. सोमवारी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. पोलीस विभागाकडून या ठिकाणी मोठा बंदोबस्त लावला जातो. याशिवाय वनविभागाच्या अधिकारी आणी कर्मचारी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून तैनात असतात. सोमवारी सौताडा येथे भगवान रामेश्वराचे लाखो भाविकांनी दर्शन घेतले.

मागील काळापासून देवस्थान विकास कामापासून वंचित असून पाहिजे तसा विकास झाला नाही तो मी येणाऱ्या काळात भरून काढत देवस्थानसाठी ब दर्जा प्राप्त करून देणार असून यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. येणाऱ्या काळात देवस्थानच्या विकास कामांना या माध्यमातून गती मिळणार आहे, असून माझा बळीराजा सुखी कर अशी प्रार्थना यावेळी आ. सुरेश धस यांनी भगवान रामेश्वराकडे केली.

यावेळी जि. प.सदस्य माऊली जरांगे, माजी नगराध्यक्ष विकास राळेभात, सभापती किरण शिंदे, सरपंच बाळू घुले, सुखदेव सानप, प्रदीप जाधव, शाहूराव टेकाळे, ऋषीकेश सानप, ऋषिकेश शेंम्बडे, काळू शिंदे, बाबासाहेब पुलावळे, बाळू काका शिंदे, भाऊसाहेब शिंदे, अनिल टेकाळे, आश्रू शेळके, अशोक सानप, गणेश सानप, संग्राम सानप, रामहरी सानप, रमेश भोरे, भरत शिंदे, अमोल शिंदे, दत्ता टेकाळे आदी सह प्रमुख मान्यवर, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटी पेन्सिल ऐवजी मुलांच्या हाती भिक्षा मागण्याचे ताट

**आष्टी । प्रतिनिधी**

शाळेत शिक्षण घेण्याच्या वयात खाती वही पेन देऊन शाळेत पाठवण्याऐवजी आई, वडील, लहान मुलांच्या हातात ताट देऊन भिक्षा मागण्यासाठी रहदारीच्या ठिकाणी पाठवत असल्याचे वास्तव समोर आले आहे. तालुक्यातील अनेक गावात अशी मुली भटकंती करताना आढळून येत आहेत. आष्टी तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागात बसस्थानक चौक रहदारी बाजारपेठेत पर जिल्ह्यातून आलेले तालुक्यातीलच पालक आपल्या अल्पवयीन मुलांना शाळेत न पाठवता त्यांना पुढे करून दिवसभर हातात ताट देऊन भिक्षा मागण्यासाठी फिरायला लावून पैसे गोळा करत असून अशी या मुलांची सुरक्षा वाऱ्यावर आहे. दरम्यान भीक मागायला लावणाऱ्या मुलांचे वास्तव समोर येत असताना यावर नियंत्रण आणणे गरजेचे असून यासाठी पावले उचलण्याची गरज असल्याची बोलली जात आहे.

**पालकावर कारवाईची मागणी**

भिक्षा मागणारी मुले येथे दुखी फिरत आहेत मुलांना भिक्षा मागायला लावून यातून पैसा कमवत कुटुंब चालवणाऱ्या पालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी बीड येथील सामाजिक कार्यकर्ते तत्वशील कांबळे यांनी केली आहे. आष्टी शहर व तालुक्यात जर असं प्रकार घडत असेल तर विशेष मोहीम राबवण्यात येईल असे आष्टीचे तहसीलदार तथा बाल संरक्षण समितीचे अध्यक्ष वैशाली पाटील यांनी सांगितले आहे.

## माजी आ. भीमरावजी धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली

# 'हरित बीड अभियान' वृक्षारोपण उपक्रमासाठी कोहिणी ग्रामपंचायच्या वतीने एक हजार वृक्षरोपण

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यात सह संपूर्ण बीड जिल्ह्यात दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणाऱ्या 'हरित बीड अभियान' या महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण उपक्रमासाठी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाने व आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे माजी आमदार भीमरावजी धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यातील कोहिणी ग्रामपंचायतचे सरपंच दादासाहेब जगताप यांनी ग्रामस्थांसमवेत कोहिनी व पाटणच्या परिसरात एक हजार वृक्षारोपण केले. यावेळी त्यांनी उपक्रमात एका दिवसात तब्बल एक हजार वृक्षांचे रोपण करण्यात आले असून, हा उपक्रम महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या सह महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाने व आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे माजी आमदार भीमरावजी धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कोहिनी पाटण ग्रामपंचायतचे सरपंच दादासाहेब जगताप यांच्या उपस्थितीत पार पडला. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरणाऱ्या या मोहिमेसाठी संपूर्ण जिल्हा प्रशासन, तालुका प्रशासन, शासकीय व खासगी संस्था, सेवाभावी संघटना, शाळा व महाविद्यालये यांची सक्रिय भागीदारी असून, सर्व यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. हरितक्रांतीचा संकल्प घेऊन सुरु झालेल्या या अभियानामुळे कोहिनी पाटण ग्रामपंचायत परिसराचे पर्यावरणीय संतुलन सुधारण्यास मदत होणार आहे. असे मत यावेळी ग्रामपंचायतचे सरपंच दादासाहेब जगताप यांनी व्यक्त केले.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT